# महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभाग, पुणे
## प्रसिध्दीपत्रक माहे सप्टेंबर - २०१८

**क्र.क / ५ / प्रसिद्धीपत्रक / ०९ / २०१८ दिनांक :-११ / १० /२०१८**

| १.नेमणूक/ सेवासमाप्ती | २.पदोन्नती/ पदावनती | ३.सेवानिवृत्ती/ स्वेच्छासेवानिवृत्ती | ४.बदली | ५.बक्षिस | ६.शिक्षा | ७.निधन | ८.संकिर्ण |
|---|---|---|---|---|---|---|---|

**१.नेमणूक / सेवासमाप्ती :- निरंक**

**2. पदोन्नती / पदावनती :-**

1. या कार्यालयाचे आदेश क्र. ई -1/प्रयंचा -पोउपनि.बि.सं.(वाह) / पदोन्नती /2018/4097 दि. 21/08/2018 आदेशान्वये प्रमुख यंत्रचालक दामोदर सुखदेवजी शेंडे नेमणुक रा.रा.पो.बल गट क्र. 4 नागपूर यांची पोलीस उपनिरीक्षक बि.सं या पदाचे (वाहतुक) या पदाचे पदोन्नतीवर मुंबई शहर अशी पदस्थापना करण्यात आली आहे. श्री.शेंडे यांनी दिनांक 05/09/2018 रोजी केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांचे कौटुंबिक अडचणीचा सहानुभुती पुर्वक विचार करुन त्यांची मुंबई शहर येथे झालेल्या पदोन्नतीवरील पदस्थापनेत अंशतः बदल करुन त्यांचे विनंतीनुसार पोलीस उपनिरीक्षक बि.सं.(वाहतुक) या पदाचे पदोन्नतीवर पोलीस आयुक्त, मुंबई शहर ऐवजी पोलीस अधिक्षक , यवतमाळ येथे रिक्त असलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्र. ई -1/प्रयंचा -पोउपनि.बि.सं.(वाह) / पदोन्नती /2018/4097 दि. 21/08/2018 आदेशामध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती लागु राहतील. सदरची सुधारीत पदस्थापना त्यांचे विनंतीवरुन असल्याने त्यांना बदली प्रवास भत्ता, पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही. तसेच त्यांनी प्रत्यक्ष पदोन्नती धारण केल्याच्या तारखेपासुन त्यांची पोलीस उपनिरीक्षक बि.सं. (वाहतुक) पदाची सेवाज्येष्ठता निश्चित होईल. त्यानुसार श्री. शेंडे यांना पदोन्नतीवर हजर होणेकामी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-१/प्रयंचा -पोउपनि बि.सं.(वाह)/ पदोन्नती /२०१८ /४६५० दि. १५/०९/२०१८).**

**३.सेवानिवृत्ती / स्वेच्छासेवानिवृत्ती :-**

१. श्री. सकलेन अहमद अब्दुल रज्जाक चौधरी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (वीजतंत्री) नेमणुक संशोधन व विकास पुणे (संचालक आस्थपना, पुणे) यांना दि. ०६/०९/२०१८ रोजी वयाची ५८ वर्ष पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) व नियम ६२ (१) नुसार त्यांना दि. ३०/०९/२०१८ रोजी मध्यान्होत्तरपासून नियत वयोमानाने सेवानिवृत्त करण्यात येत आहे. श्री. चौधरी यांना नियमानुसार लागू असलेले सेवानिवृत्तीनंतरचे सर्व फायदे, काही शासकीय येणे वसुली असल्यास ती वजाती करुन अनुज्ञेय आहेत.
श्री. चौधरी यांना दि. ३०/०९/२०१८ रोजी मध्यान्होत्तर पासून सेवामुक्त करण्यात यावे. आणि त्यांचे नाव दिनांक ०१/१०/२०१८ रोजी पासून हजेरीपट व इतर तत्सम शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे आणि त्यांचेकडील ओळखपत्र व कुटुंब आरोग्य योजनेचे कार्ड जमा करुन घेण्यात यावे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-४/ आस्था -२/ निवसेनि /सपोउनि (वीजतंत्री) चौधरी /२०१८ / ४४१९ दि. ०४/०९/२०१८).**

२. श्री. मिलींद मनोहर साळवे, पोलीस निरिक्षक , बि.सं. (अभियांत्रिकी), नेमणुक सातारा यांना दिनांक ०९/०९/२०१८ रोजी वयाची ५८ वर्ष पूर्ण होत असल्याने त्यांना वरील संदर्भाकिंत आदेशान्वये व महाराष्ट्र नागरी

सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम १९८२ मधील नियम क्र. ६२(१) नुसार दिनांक ३०/०९/२०१८ रोजी कार्यालयीन वेळेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती करण्यात येत आहे. त्यांना नियमानुसार लागू असलेले सेवानिवृत्तीचे सर्व फायदे, काही शासकीय येणे वसुली असलेस ती वजाती करुन त्यानंतर अनुज्ञेय आहेत.

श्री. मिलींद मनोहर साळवे, पोलीस निरिक्षक , बि.सं. (अभियांत्रिकी), नेमणुक सातारा यांना दिनांक ३०/०९/२०१८ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवामुक्त करण्यात यावे व पुर्तता अहवाल सादर करावा. त्यांचे नाव दिनांक ०१/१०/२०१८ रोजी पासून हजेरी पट व इतर शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे. तसेच त्यांचेकडील ओळखपत्र जमा करुन घेण्यात यावे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-१/ पोनिबिसं. (अभि)/ साळवे /निवसेनि/ २०१८ / ४८४८ दि. २७/०९/२०१८).**

३. श्री.वासूदेव रामचंद्र खवले, पोलीस निरीक्षक बि.सं. (वाहतुक) नेमणुक रा.रा.पो.बल गट क्र. २ पुणे यांना दिनांक ०७/०८/२०१८ रोजी वयाची ५८ वर्ष पूर्ण होत असल्याने त्यांना वरील संदर्भाकिंत आदेशान्वये व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.६२(१) नुसार दिनांक ३०/०९/२०१८ रोजी कार्यालयीन वेळेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात येत आहे. त्यांना नियमानुसार लागू असलेले सेवानिवृत्तीचे सर्व फायदे काही शासकीय येणे वसुली असलेस ती वजावती करुन त्यानंतर अनुज्ञेय आहेत.

श्री.वासूदेव रामचंद्र खवले, पोलीस निरीक्षक बि.सं. (वाहतुक) नेमणुक रा.रा.पो.बल गट क्र. २ पुणे यांना दिनांक ३०/०९/२०१८ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवामुक्त करण्यात यावे. व पूर्तता अहवाल सादर करावा. त्यांचे नाव दिनांक ०१/१०/२०१८ रोजी पासून हजेरी पट व इतर शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे. तसेच त्यांचेकडील ओळखपत्र जमा करुन घेण्यात घ्यावे.

श्री. वासुदेव रामचंद्र खवले, पोलीस निरीक्षक, बि.सं.(वाहतुक) नेमणुक रा.रा.पो.बल गट क्र, २ पुणे यांचे सेवानिवृत्तीमुळे दिनांक ०१/१०/२०१८ रोजी पासुन रिक्त होणा-या पदाचा अतिरीक्त कार्यभार पोलीस निरीक्षक, बि.सं. (वाहतुक) विठ्ठल तुकाराम पाटील, नेमणुक रा.रा.पो.बल गट क्र.१ पुणे यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत सपोविण्यात येत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-१/ पोनिबिसं. (वाह)/ खवले /निवसेनि/ २०१८ / ४८७४ दि. २९/०९/२०१८).**

**४. बदली :-**

**१)** उपरोक्त संदर्भ व विषयान्वये, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न (२) अन्वये विशेषीकृत अभिकरण स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन, गठीत केलेल्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार खालील पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) यांच्या संदर्भ क्र.१ व २ अन्वये प्रशासकीय सोयीने बदल्या करण्यात आलेल्या आहेत. मात्र सदर आदेशातील खालील नमूद पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) यांनी त्यांच्या कौटुंबिक व वैद्यकीय कारणास्तव त्यांचे बदलीचे ठिकाणात बदल करणेबाबत तसेच बदली करणेबाबत आज्ञाकिंत कक्षात विनंती केलेली आहे. त्यांच्या विनंतीचा समितीने सांगोपांग विचार करुन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांचे **विनंतीवरुन** बदली करण्यात येत आहे..

**विनंती बदल्या -**

| अ. क्र. | पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) | सध्याचे नेमणूकीचे ठिकाण / आस्थापना | बदलीवर नेमणूकीचे ठिकाण/आस्थापना (बिनतारी संदेश विभाग) | अंश:त बदल करुन देण्यात आलेले बदलीचे ठिकाण/आस्थापना (बिनतारी संदेश विभाग) |
|---|---|---|---|---|
| १. | दिनानाथ पिरन पाटील | धुळे<br>पोलीस अधीक्षक धुळे | जळगाव<br>पोलीस अधीक्षक जळगाव | रा.आ.प्र.दल धुळे<br>सहा.समादेशक, रा.आ.प्र.दल धुळे |
| २. | सचिन सौदागर कदम | रा.रा.पो.बल गट क्र.१० | पुणे शहर | उस्मानाबाद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सोलापूर<br>समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१० सोलापूर, | पोलीस आयुक्त, पुणे शहर | पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद |
| ३ | पोपट भाऊराव सानप | गट क्र.२, पुणे<br>समादेशक रा.रा.पो.बल गट क्र.२, पुणे | पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण | सोलापूर ग्रामीण ऐवजी पोलीस आयुक्त नवी मुंबई |
| ४. | सलीम इस्माईल तडवी | रा.आ.प्र.दल धुळे<br>सहा.समादेशक, रा.आ.प्र.दल धुळे | जळगाव<br>पोलीस अधीक्षक जळगाव | -- |
| ५. | प्रियांका दत्तात्रय लोकरे | पुणे शहर<br>पोलीस आयुक्त, पुणे शहर | सोलापूर ग्रामीण<br>पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण | -- |
| ६. | वैभव नानासाहेब कदम | पुणे शहर<br>पोलीस आयुक्त, पुणे शहर | सातारा<br>पोलीस अधीक्षक, सातारा | -- |
| ७. | संजय किसन गायकवाड | रा.आ.प्र.दल धुळे<br>सहा.समादेशक, रा.आ.प्र.दल धुळे | अहमदनगर<br>पोलीस अधीक्षक अहमदनगर | -- |

२. ज्या पोहवा (बिनतारी यंत्रचालक) यांची विनंतीवरुन बदली केलेली आहे, त्यांना बदली प्रवास भत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय नाही.

३. संबंधित घटक प्रमुखांनी उपरोक्त बदली झालेल्या पोहवा (बिनतारी यंत्रचालक) यांना बदलीवर सोडताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या पोहवा (बिनतारी यंत्रचालक) यांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणूकीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच सदर पोहवा (बिनतारी यंत्रचालक) यांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास निश्चितपणे कळवावा.

४. उपरोक्त आदेशान्वये पोहवा (बिनतारी यंत्रचालक) यांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर पोहवा (बिनतारी यंत्रचालक) हजर होण्याची जबाबदारी बदलून गेलेल्या पोलीस घटक कार्यालयाची राहिल, याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहित वेळेत हजर न होणाऱ्या पोहवा (बिनतारी यंत्रचालक) यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

५. संबंधित घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पोहवा (बिनतारी यंत्रचालक) या आदेशानुसार बदलीवर नेमणूकीच्या ठिकाणी हजर होणार नाही, त्यांची नावे कृपया या कार्यालयास कळवावीत. तसेच त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पोहवा (बिनतारी यंत्रचालक) बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील अशा पोहवा (बिनतारी यंत्रचालक) यांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे आणि त्याबाबतचा अहवालदेखील या कार्यालयास सादर करावा.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-२/ई-३/ विनंती बदल्या - १८/पो.हवा.(बियंचा)/२०१८/४८५४ दि. २५/०९/२०१८).**

**२)** उपरोक्त संदर्भ व विषयान्वये , महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न (२) अन्वये विशेषकृत अभिकरणस्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन गठीत समितीने केलेल्या शिफारशीनुसार खालील कर्मचारी यांनी केलेल्या विनंतीचा व कौटूबिंक अडचणीचा सांगोपांग विचार करुन त्यांचे विनंतीनुसार नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदली करण्यात येत आहे.

| अ क्र. | कर्मचा-यांचे नाव व पदनाम | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना | बदलीवर नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना |
|---|---|---|---|
| १. | श्री. गोपाल मंगोजी वालदे<br>सपोउपनि/ प्रमुख यंत्रचालक | पोलीस उप-आयुक्त, बि.सं.मुंबई शहर | अमरावती शहर<br>पोलीस आयुक्त, अमरावती शहर |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. महेश सुखदेवराव वानखेडे सपोउनि/प्रमुख यंत्रचालक | पोलीस उप-आयुक्त, बि.सं. मुंबई शहर | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ नागपूर |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ ई-५/ प्रयंचा/ विनंती बदल्या - २०१८/ २०१८/४८०३ दि. २५/०९/२०१८).**

**५. बक्षिस :- निरंक**

**६. शिक्षा :-**

**1)** तुम्ही श्री.के.व्ही.प्रसाद, पो.उप-नि.बि.सं.(वाह) नाशिक ग्रामीण येथे कार्यरत आहात, तुमचे माहे एप्रिल 2017 ते मार्च -2018 या कालावधीतील एकूण 48 पंधरवडा अकस्मात भेटीपैकी 11 भेटीचे अहवालामध्ये त्रुटी आढळुन आलेल्या आहेत, तुमचे प्रत्येक त्रुटीबाबत मा.संचालक कार्यालयीन परिपत्रक क्र. 39 (भाग -3) मध्ये दिलेल्या सुचनांस अनुसरुन पंधरवडा अकस्मात भेटीचेवेळी परिपूर्ण तपासणी करुन, त्रुटी विरहीत अहवाल सादर करण्याची दक्षता घेणेस प्रत्येकवेळी सूचनापत्र देण्यात आलेली आहेत. तथापि, तुम्ही वरिष्ठ कार्यालयीन परिपत्रक / सूचनापत्रांची दखल घेऊन कार्यवाहीमध्ये सुधारणा न करता सातत्याने त्रुटीयुक्त अहवाल सादर करीत आहात. एकंदरीत वरिष्ठ कार्यालयाने नेमून दिलेल्या कर्तव्याचे परिपूर्ण पालन न करणे, सुचनापत्रांकडे दुर्लक्ष करुन कार्यवाहीमध्ये सुधारणा न करणे अशी तुम्हांस सवय असल्याचे स्पष्ट होत आहे. सदरची बाब गंभीर असुन पोलीस दलाचे शिस्तीस अनुसरुन नाही. अशा प्रकारे तुम्ही कसुरी केल्याचे सिध्द होत असल्याने तुम्हास खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेशः-**

मी, प्रकाश तु. सोनवणे, पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे वर नमूद केलेल्या कसुरीमुळे, श्री. के.व्ही.प्रसाद , पोउपनि. बि.सं.(वाह) नाशिक ग्रामीण यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग -1 नियम क्र.438 मधील पोटनियम क्र. रोमन 5 (अे) (3) तसेच मा.संचालक पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे यांचे कार्यालयीन जा.क्र. सी/3/349/मतका / 1993 दिनांक 06/01/1994 मधील तरतुदी नुसार ''समज''ही शिक्षा देत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ ई-२/ पोउपनि शिक्षा आदेश / संकीर्ण/२०१८ /४८७३ दि. २५/०९/२०१८).**

**2)** तुम्ही श्री.एफ.बी.तडवी, पो.उप-नि.बि.सं.(अभि) नेमणुक . रा.रा.पो.बल गट क्र. 6 धुळे येथे कार्यरत आहात, तुमचे माहे एप्रिल - 2017 ते मार्च -2018 या कालावधीतील एकूण 24 पंधरवडा अकस्मात भेटीपैकी 06 भेटीचे अहवाल सादर केलेले नाहीत. अथवा भेट देता न आले बाबतची स्पष्टीकरण सुध्दा सादर केलेले नाही. मा.संचालक कार्यालयीन परिपत्रक क्र. 39 (भाग -3) अनुसार पोलीस उप-निरिक्षक बि.सं. पदास पंधरवडा अकस्मात भेट अनिवार्य असल्याचे सूचनापत्रांव्दारे वेळोवेळी सुचित करण्यात आले आहे. तसेच या कार्यालयाने घेतलेल्या वार्षिक तपासणी अहवाल दि. 31/03/2018 मध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. तथापि तुम्ही वरिष्ठ कार्यालयीन सूचनापत्रांची दखल घेऊन कार्यवाहीमध्ये सुधारणा केल्याचे दिसून येत नाही. एकंदरीत वरिष्ठ कार्यालयाने नेमून दिलेल्या कर्तव्याचे परिपूर्ण पालन न करणे, सूचनापत्रांकडे दुर्लक्ष करुन कार्यवाहीमध्ये सुधारणा न करणे अशी तुम्हांस सवय असल्याचे सिध्द होत आहे. सदरची बाब गंभीर असून पोलीस दलाचे शिस्तीस अनुसरुन नाही. अशाप्रकारे तुम्ही कसुरी केल्याचे सिध्द होत असल्याने तुम्हास खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेशः-**

मी, प्रकाश तु. सोनवणे, पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे वर नमूद केलेल्या कसुरीमुळे, श्री.एफ.बी.तडवी, पोउपनि. बि.सं.(अभि)ने.रा.रा.पो.बल गट क्र.6 धुळे यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग -1 नियम क्र.438 मधील पोटनियम क्र. रोमन 5 (अे) (3) तसेच मा.संचालक पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे यांचे कार्यालयीन जा.क्र. सी/3/349/मतका / 1993 दिनांक 06/01/1994 मधील तरतुदी नुसार ''समज''ही शिक्षा देत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ ई-२/ पोउपनि शिक्षा आदेश / संकीर्ण/२०१८ /४८७३ दि. २५/०९/२०१८).**

**3)** तुम्ही श्री.आय.आय.तडवी, पो.उप-नि.बि.सं.( वाह ) जळगांव येथे कार्यरत आहात, माहे एप्रिल - 2017 ते मार्च -2018 या कालावधीतील एकूण 48 पंधरवडा अकस्मात भेटीपैकी 11 भेटीचे अहवालामध्ये त्रुटी आढळुन आल्या आहेत. प्रत्येक त्रुटीबाबत मा.संचालक कार्यालयीन परिपत्रक क्र. 39 (भाग -3) दिलेल्या सुचनांनुसार पंधरवडा अकस्मात भेटीच्यावेळी परिपुर्ण तपासणी करुन त्रुटी विरहीत अहवाल सादर करण्याची दक्षता घेणेस वेळोवेळी सुचनापत्र देण्यात आलेले आहेत. तथापि तुम्ही वरिष्ठ कार्यालयीन परिपत्रक, सुचनांची दखल घेऊन कार्यवाही मध्ये सुधारणा न करता सातत्याने त्रुटीयुक्त अहवाल सादर करीत आहात. एकंदरीत वरिष्ठ कार्यालयाने नेमून दिलेल्या कर्तव्याचे परिपुर्ण पालन न करणे, सुचना पत्रांकडे दुर्लक्ष करुन कार्यवाहीमध्ये सुधारणा न करणे इत्यादीबाबत आपणांस सवय असल्याचे स्पष्ट होत आहे. सदरची बाब गंभीर असून पोलीस दलाचे शिस्तीस अनुसरुन नाही. अशाप्रकारे तुम्ही दोषी आढळुन आला आहात. यास्तव, तुम्हास खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेशः-**

मी, प्रकाश तु. सोनवणे, पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे वर नमूद केलेल्या कसुरीमुळे, श्री. आय.आय.तडवी, पोउपनि. बि.सं.(वाह)ने.जळगांव यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग -1 नियम क्र.438 मधील पोटनियम क्र. रोमन 5 (अे) (3) तसेच मा.संचालक पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे यांचे कार्यालयीन जा.क्र. सी/3/349/मतका / 1993 दिनांक 06/01/1994 मधील तरतुदी नुसार ''समज''ही शिक्षा देत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ ई-२/ पोउपनि शिक्षा आदेश / संकीर्ण/२०१८ /४८७३ दि. २५/०९/२०१८).**

**4)** तुम्ही पो.हवा./ बिनतारी यंत्रचालक एस.ए.खोत तत्कालीन नेमणुक रा.रा.पो.बल गट क्र.10 सोलापुर सध्या सपोउपनि/प्रमुख यंत्रचालक पदावर सिंधदुर्ग येथे कार्यरत आहात. तुम्ही रायगड व्ही-सॅट स्थानक येथे प्रतिनियुक्ती कर्तव्यावर दिनांक असताना दि. 20/02/2017 रोजी नवी मुंबई व्ही-सॅट स्थानकास प्रक्षेपित केलेल्या बि.सं.क्र. 156 व 157 मध्ये मे. न्यायालयात हजर राहणेची तारीख चुकीची भारीत केली. चूक लक्षात आल्यानंतर चुकीची दुरुस्ती करुन दोन्ही संदेश पुनःप्रक्षेपित करताना बिनतारी कार्यप्रणाली नुसार, सुधारीत संदेश पाठवित असलेबाबत संदेशावर सूचित केले नाही अथवा नवी मुंबई स्थानकास त्याप्रमाणे काहीएक कळविले नाही. तसेच, ट्रफिकला प्रथम व सुधारीत अशा प्रक्षेपित केलेल्या दोन्ही संदेशांच्या प्रती जोडणे आवश्यक असतांना, केवळ सुधारीत प्रत जोडली असल्याने माझी चूक झालेली नाही असा बेजबाबदारपणे खुलासा सादर केला आहे. सदर चुकीमुळे संबंधीत पोलीस निरीक्षक हे नियोजित दिनांकास मे.न्यायालयात साक्षकामी हजर राहू शकलेले नाहीत. अशा प्रकारे तुम्ही बिनतारी कार्यप्रणाली नुसार कर्तव्य न बजावल्यामुळे दोषी आढळुन आला आहात. यास्तव, तुम्हास खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेशः-**

मी, प्रकाश तु. सोनवणे, पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे वर नमूद केलेल्या कसुरीमुळे, महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग -1 नियम क्र.438 मधील पोटनियम क्र. रोमन 5 (अे) (3) तसेच मा.संचालक पोलीस बिनतारी संदेश म.राज्य पुणे यांचे कार्यालयीन जा.क्र. सी/3/349/मतका / 1993 दिनांक 06/01/1994 मधील तरतुदी नुसार तुम्हास ''सक्त ताकीद'' ही शिक्षा देत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ ई-२/ पोउपनि शिक्षा आदेश / संकीर्ण/२०१८ /४८७३ दि. २५/०९/२०१८).**

**७. निधनः- निरंक**

**८. संकीर्णः-**

**१. <u>आश्वासित प्रगती योजनाः-</u>**

**१)** उपरोक्त संदर्भ व विषयान्वये खालील नमूद महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभागामधील कर्मचारी यांनी पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली अर्हता पूर्ण केल्याने, तसेच त्यांनी सलग १२ वर्षे एकाच पदावर सेवा पूर्ण केल्यामुळे व त्यांना पुढील पदोन्नतीची संधी अद्याप न मिळाल्यामुळे उपरोक्त नमूद शासन निर्णयातील तरतुदींनुसार त्यांना नियमित १२ वर्षाचे सेवेनंतर वरच्या पदाच्या पदोन्नतीच्या साखळीतील वेतनश्रेणी देय आहे. त्यामुळे त्यांच्या **नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून त्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.**

| **संवर्ग : पोलीस हवालदार बिनतारी यंत्रचालक** | | | | |
|---|---|---|---|---|
| सध्याची वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड वेतन) | | रु.५२००/-- २०२००/- + ग्रेड वेतन रु.२४००/- | | |
| सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पहिल्या लाभाची देय वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रे.वेतन) | | रु.५२००/-- २०२००/- + ग्रेड वेतन रु.२८००/- | | |
| <u>अ. क्र.</u> | <u>बिनतारी कर्मचारी यांचे नाव व हुद्दा</u> | <u>नेमणूक</u> | <u>सध्याचे पदावरील नियुक्तीचा दिनांक</u> | <u>सु.से.आ.प्रा. योजनेतंर्गत पहिला लाभ देय दिनांक</u> |
| **१.** | **गजानन महादु काठोळे, पोहवा बियंचा** | **वाशिम** | **१६.११.२००५** | **१६.११.२०१७** |

३/- वरील नमूद कर्मचारी यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालविण्यासंबंधी योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाली तरी सदर कर्मचा-यांची नावे मूळ जेष्ठता सूचित राहतील आणि सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्त पदांमध्ये योग्यवेळी नियमित पदोन्नतीसाठी (Functional Promotion) त्यांचा विचार करण्यात येईल.

४/- नियमित पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांस या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याचप्रमाणे नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यांस देखील या पदोन्नतीचा लाभ देय होणार नाही.

५/- तसेच नमूद कर्मचा-यांना विकल्प द्यावयाचा असल्यास त्यांचेकडून विहित मुदतीत विकल्प घेऊन त्याप्रमाणे वेतन निश्‍चिती करावी. तशा आशयाचे बंधपत्र संबंधित कर्मचा-यांकडून लिहून घ्यावे.

६/- संबंधित आस्थापना अधिकारी यांनी नमूद कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात तशी नोंद घेऊन त्यांची वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतननिश्‍चिती करावी व पूर्तता अहवाल कृपया या कार्यालयास पाठवावा.

७/- उपरोक्त नमूद पोलीस बिनतारी कर्मचारी यांना सदर योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय असले तरी संबंधित घटक प्रमुखांनी संबंधित बिनतारी कर्मचारी यांचेविरुध्द काही विभागीय चौकशी प्रलींबित अथवा प्रस्तावित केली असल्यास किंवा त्यांचेविरुध्द काही गुन्हा नोंद असल्यास किंवा त्यांचेविरुध्द कोणतेही न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यास सदर योजनेअंतर्गत लाभ देऊ नयेत.

८/- सदर आदेशातील नमूद कर्मचारी यांना सदर पदोन्नतीबाबत काही शंका/अडचण/दुरुस्ती असल्यास त्यांनी त्यांचे अर्ज थेट या कार्यालयास सादर न करता ते पोलीस अधीक्षक, पूर्व विभाग नागपूर / पश्चिम विभाग पुणे व पोलीस उप आयुक्त, मुंबई यांचे मार्फतीनेच या कार्यालयास सादर करावेत. थेट प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधितांना समज देण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी कृपया अशाप्रकारच्या अर्जांची शहानिशा करुन नियमाप्रमाणे पडताळणी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह असे अर्ज या कार्यालयास पाठवावेत.

९/- आपले आस्थापनेवरील उपरोक्तपैकी काही कर्मचारी यांची दुस-या आस्थापनेवर बदली झाली असल्यास, सदरचे आदेश परस्पर संबंधितांचे नेमणूकीचे ठिकाणी पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे. त्याबाबत या कार्यालयास पत्रव्यवहार करण्यात येऊ नये, ही विनंती.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ ई-७/ आप्रयो/ १२ वर्षे - २०१८/४६७५ दि. १७/०९/२०१८)**

**२)** महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय अ.क्र.१ अन्वये गट "क" व "ड" मधिल कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची दि.०१ आक्टोबर,१९९४ पासून अंमलात आलेली कालबध्द पदोन्नतीची योजना उपरोक्त संदर्भ अ.क्र.२ च्या शासन निर्णयानुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना म्हणून दि.०१ ऑगस्ट २००१ पासून लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" या नावाने दि.०१/१०/२००६ पासून अंमलात येणेसाठी महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडून उपरोक्त संदर्भ अ.क्र.३ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" कमाल वेतन बँड पीबी-३(रु.१५६००-३९१००)+५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणा-या कर्मचा-यांना लागू राहणार असलेने पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे. कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली कर्मचा-यांनी घेतलेला लाभ हा या योजनेखाली त्या कर्मचा-यांचा पहिला लाभ समजण्यात येईल. पहिल्या लाभानंतर १२ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-यांस पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येते.

त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ अ.क्र.२, ३, व ४ अन्वये निर्गमित शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असलेल्या पोलीस बिनतारी विभागामधील अधिकारी कर्मचारी यांनी पहिल्या लाभानंतर १२ वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णय अ.क्र.४ अन्वये खालील नमूद बिनतारी कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दूसरा लाभ म्हणून त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून मंजूर करण्यात येत आहे.

| **संवर्ग:- पोलीस उपनिरीक्षक, (वाह)** | | | |
|---|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन | | रु..९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.२८००/- | |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | | रु..९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३००/- | |
| **अ.क्र.** | **बिनतारी अधिकारी /कर्मचारी यांचे नांव हुद्दा** | **नेमणूक** | **सु.से.आ.प्र.योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक** |
| १ | श्री अरुण भास्करराव देशमुख-पोउपनि बि सं (वाह) (सेवानिवृत्त दि.३१/१०/२००९) | यवतमाळ | ०१/१०/२००६ |

| **संवर्ग:- स .पो.उप निरीक्षक ( प्रयंचा)** | | | |
|---|---|---|---|
| सध्याचा वेतनबँड व ग्रेड वेतन | | रु. ५२००/--२०२००/- ग्रेड वेतन रु.२८००/- | |
| दुस-या लाभाचा देय वरिष्ठ वेतनबँड व ग्रेड वेतन | | रु. ९३००-३४८००/- ग्रेड वेतन रु.४३००/- | |
| **अ.क्र.** | **बिनतारी अधिकारी /कर्मचारी यांचे नांव हुद्दा** | **नेमणूक** | **सु.से.आ.प्र.योजनेअंतर्गत दुसरा लाभ देय दिनांक** |
| १ | श्री. रमेश महादेव साळुंखे- सपोउनि प्रयंचा (सेवानिवृत्त दि.३०/०६/२०१८) | रा.रा.पो.बल गट क्र७ दौंड | २६/१२/२०१५ |
| २ | श्री. दत्तात्रय देवराव जाधव- सपोउपनि-प्रयंचा (सेवानिवृत्त दि.२८/०२/२००९) | परभणी | ०१/१०/२००६ |

सदरचा लाभ मंजूर करताना उपरोक्त संदर्भ अ.क्र.७ व ८ चे शासन निर्णयामधील तरतूदीनुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शा.नि.क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि.१ जुलै,२०११ मध्ये मुद्दा क्र.१ समोरील स्पष्टीकरणामध्ये "सेवेत कार्यरत असताना पदोन्नी न मिळाल्यामुळे निर्माण झालेली कुंठितता घालविण्याचा या योजनेचा उद्देश आहे. त्यामुळे जरी पूर्वलक्षी प्रभावाने योजना लागू केली असली तरी आदेशाच्या दिनांकाला जे सेवेत कार्यरत आहेत त्यांनाच या योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेतलेला आहे. म्हणून **दि.०१/१०/२००६ ते**

त्याअनुषंगाने शासन सेवेतुन सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना वेतननिश्चितीचा प्रत्यक्ष लाभ हा फक्त निवृत्तीवेतन विषयक/कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभांकरिताच म्हणजेच निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन, सेवानिवृत्ती उपदान/मृत्यु उपदान तसेच रजा रोखीकरण या लाभ मंजुरीच्या प्रयोजनार्थ अनुज्ञेय राहील. सदर दुसरा लाभ मंजूरीच्या अनुषंगाने थकबाकीची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

नमूद अधिकारी यांचे वेतननिश्चितीबाबत क्र.वेतन ११११/ प्र.क्र.८/सेवा-३, दि.११ मे,२०१७ अनुषंगाने योग्य ती कार्यवाही घेण्यात यावी.

तसेच, श्री निलकंठ सदाशिव भोयर-सपोउनि प्रयंचा-तत्का.नेम. लोहमार्ग नागपुर हे दि.३१/१०/२०१८ रोजी सेवानिवृत्त झालेले आहे. त्यांची जात कुणबी - इमाव असून सदर जातीचे जात वैधता प्रमाणपत्र त्यांनी या कार्यालयास सादर केलेले नसल्याने, सु.से.आ.प्र.योजनेचा लाभासाठी समितीने त्यांचा अर्ज अपात्र केलेला आहे.

उपरोक्त सर्व सेवानिवृत्त पोलीस/कर्मचारी यांना सदर बाबत अवगत करण्यात यावे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ ई-७/से.नि.कर्म/सु.से.आ.प्र.यो -२४ वर्षे - ४९५२/२०१८ दि. १७/०९/२०१८)**

दिनांक : 11 /१०/२०१८

11/10/18

**( सी.ए.ढाकणे )**
**पोलीस अधीक्षक, बि.सं. (मुख्या),**
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, म.रा.पुणे, कार्यालय